# इतिहास विभाग

# अहवाल २०२२-२३

# ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त अतिथी व्याख्यान




**ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त इतिहास विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यान प्रसंगी स्वागत सत्कार समारंभ**

**दि. ०८/०८/२०२२**










स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या पार्श्वभूमीवर ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त इतिहास विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. के. डब्ल्यू. पावडे दि. ०८/०८/२०२२






दि. ०८/०८/२०२२ रोजी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमालेत ऑगस्ट क्रांतीदिनी इतिहास विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, प्रा. डॉ. कुलकर्णी



# ऑगस्ट क्रांतीदिनानिमित्त अतिथी व्याख्यान

सोमवार, दि ०८/०८/२०२२

**उद्दिष्ट :**

भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील ऑगस्ट क्रांतीदिनाचे महत्व विद्यार्थ्यांना माहीत करून देण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय वृत्तीची रुजवणूक करणे, ब्रिटीशांच्या शोषक वसाहतवादाविरुद्ध भारतीयांनी दिलेल्या प्रखर लढ्याची जाणीव निर्माण करणे, भारतीय नागरिकांमध्ये स्वातंत्र्याचा आदर करण्याची वृत्ती निर्माण करणे, तसेच भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास अभ्यासण्यास मदत करणे हा या व्याख्यान आयोजनामागील उद्देश होय.

९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडो आंदोलनांतर्गत झालेल्या क्रांतिकारक उठावाचे स्मरण करण्यासाठी दरवर्षी ९ ऑगस्ट हा दिवस ऑगस्ट क्रांतीदिन म्हणून भारतभर साजरा केला जातो. या दिनाच्या औचित्त्याने व स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित व्याख्यानमाले अंतर्गत महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने सोमवार दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी ११.३० वाजता '**ऑगस्ट क्रांती दिन**' या विषयावर मोहेकर महाविद्यालय, कळंब येथील इतिहास विभागातील **प्रा. डॉ. के. डब्लू. पावडे** यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाला महाविद्यालयातील ४४ विद्यार्थी व १३ अधिव्याख्यात्यांनी उपस्थिती नोंदवली.

या कार्यक्रमात बोलत असताना प्रा.डॉ. पावडे यांनी "भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील म.गांधी यांच्या नेतृत्वाखालील भारत छोडो आंदोलन आणि त्याच्याशी संबंधित घटनाक्रम विस्तृतपणे मांडताना "९ ऑगस्ट १९४२ रोजी भारतीय जनतेने स्वातंत्र्याच्या दृष्टीने उचललेले व्यापक व सामुहिक पाऊल म्हणजे ऑगस्ट क्रांतीदिन होय. हा १८५७ च्या उठवा नंतरचा सर्वात मोठा स्वातंत्र्यसंग्राम होता" असे म्हंटले. रशियन क्रांती, फ्रेंच राज्यक्रांती या जागतिक क्रांत्यांमध्ये त्या-त्या देशातील केवळ १% जनतेने प्रत्यक्ष सहभाग घेतला होता. पण ऑगस्ट क्रांती आणि भारत छोडो आंदोलन या क्रांतीकार्यामध्ये भारत देशातील २०% लोकांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. त्यामुळे ब्रिटिशांनाही भारतीयांच्या स्वातंत्र्य भावनेच्या तीव्रतेची जाणीव झाली, भारतीय स्वातंत्र्याची निर्णायक वाटचाल सुरु झाली, असे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थितांच्या हस्ते भारतमातेचे प्रतिमापूजन करून करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे व अध्यक्षांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. व्याख्यात्यांचा परिचय व प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख व संयोजक प्रा.डॉ. जयश्री कुलकर्णी यांनी केले. यानंतर प्रमुख व्याख्यात्यांचे मार्गदर्शन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. शेवटी हिंदी विभागातील प्रा.डॉ. संजय जोशी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता सामुहिक पसायदान म्हणून झाली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विभागातील सहकारी श्री. रविंद्र कुलकर्णी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्या करिता इतिहास विभागातील श्री. रविंद्र कुलकर्णी, श्री देव्हारे यांनी, तसेच इतर अध्यापक-कर्मचाऱ्यांनी मोलाचे योगदान दिले.

उद्दिष्टपूर्ती :

ऑगस्ट क्रांतीदिन विषयावरील अयोजित व्याख्यानातून प्रा.डॉ. के. डब्लू. पावडे यांनी आपल्या ओघवत्या शैलीने विद्यार्थ्यांसमोर भारत छोडो आंदोलनातील ऑगस्ट क्रांतीदिनाचे चित्र उभे केले. विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्यलढा, त्यातील भारतीयांचे योगदान व स्वातंत्र्याचे महत्व ज्ञात झाले. यातूनच विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय वृत्तीची रुजवणूक होण्यास व स्वातंत्र्याचा आदर करण्याची वृत्ती निर्माण होण्यास मदत झाली. तसेच भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास अभ्यासण्यास मदत झाली.

# हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त अतिथी व्याख्यान








हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षारंभानिमित्त हैद्राबाद मुक्तीदिनी इतिहास विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यान प्रसंगी स्वागत सत्कार समारंभ दि. १६/०९/२०२२







हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षारंभानिमित्त हैद्राबाद मुक्तीदिनी इतिहास विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यान प्रसंगी बोलताना प्रा. डॉ. सतीश कदम दि. १६/०९/२०२२






हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षारंभानिमित्त हैद्राबाद मुक्तीदिनी इतिहास विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यान प्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी . १६/०९/२०२२

हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षारंभानिमित्त हैद्राबाद मुक्तीदिनी इतिहास विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यान प्रसंगी प्रास्ताविक करताना इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी



# <u>हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त अतिथी व्याख्यान</u>

शुक्रवार, दि १६/०९/२०२२

उद्दिष्ट :

भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे महत्व विद्यार्थ्यांना माहीत करून देण्याबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये हैद्राबाद मुक्तीसंग्रामाविषयी जिज्ञासा निर्माण करणे, हैद्राबादच्या निजामशाहीविषयी सविस्तर माहिती देणे, निजामाच्या शोषक विद्रोही व हटवादी भूमिकेविरुध्द हैद्राबाद संस्थानातील प्रजेने आणि भारत सरकारच्यावतीने गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी दिलेल्या प्रखर लढ्याची सविस्तर माहिती देणे, विद्यार्थ्यांना हैद्राबाद संस्थानातील मराठवाड्याच्या स्वातंत्र्याचे महत्व सांगणे, तसेच हैद्राबाद मुक्तीलढ्याचा संशोधानाधारित इतिहास रंजकतेने अभ्यासण्यास मदत करणे हा या व्याख्यान आयोजनामागील उद्देश होता.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थान जुलुमी निजामशहाच्या वर्चस्वातून मुक्त झाले. तो दिवस हैद्राबाद मुक्तीसंग्रामदिन म्हणून भारतभर साजरा केला जातो. या दिनाच्या औचित्याने व हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या अमृत महोत्सव वर्षारंभानिमित्त महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या वतीने शुक्रवार दिनांक १६ सप्टेंबर २०२२ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० यावेळेत **<u>'हैद्राबाद मुक्तीसंग्राम'</u>** या विषयावर यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, तुळजापूर येथील इतिहास विभाग प्रमुख, तसेच विख्यात इतिहास संशोधक **<u>प्रा. डॉ. सतीश कदम</u>** यांचे अतिथी व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानाला महाविद्यालयातील ७७ विद्यार्थी व १४ अधिव्याख्यात्यांनी उपस्थिती नोंदवली

या पूर्वनियोजित कार्यक्रमात बोलत असताना प्रा. डॉ. सतीश कदम यांनी "भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महत्वपूर्ण टप्पा म्हणजे संस्थानांचे विलीनीकरण आणि त्यातील मैलाचा दगड म्हणजे हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे पर्व होय" असे मत व्यक्त केले. पुढे हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचा प्रवास स्पष्ट करताना त्यांनी असफजाही/निजामशाहीची स्थापना, निजामशाही राज्यातील प्रदेश, या घराण्यातील ७ निजाम, त्यांचे प्रशासन, त्यांचे धोरण याबरोबरच ब्रिटीश-निजाम संबंध आणि हैद्राबाद मुक्तीलढ्यातील विविध स्वातंत्र्य सेनानींचे योगदान यावर प्रकाश टाकला. शेवटचा निजाम मीर उस्मानअली खान याची कारकीर्द आणि हैद्राबाद संस्थानाच्या विलीनीकरणापूर्वीचे, तसेच नंतरचे त्याचे आयुष्य याबाबतच्या नाविन्यपूर्ण गोष्टी अतिशय सुंदर शब्दात त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मनोरंजक पद्धतीने मांडल्या उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थितांच्या हस्ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचे, अध्यक्षांचे व संयोजकांचे तसेच उपस्थित अधिव्याख्यात्यांचे स्वागत पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले. व्याख्यात्यांचा परिचय श्री रविंद्र कुलकर्णी यांनी करून दिला, तर प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख व कार्यक्रमाच्या संयोजक प्रा.डॉ. जयश्री कुलकर्णी यांनी केले. यानंतर प्रमुख व्याख्यात्यांचे मार्गदर्शन झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत चौधरी यांनी कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. यावेळी त्यांनी प्रा. डॉ. सतीश कदम यांच्या मार्गदर्शनाबद्दल आणि नाविन्यपूर्ण माहिती व ज्ञानप्राप्तीबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यक्रमाच्या शेवटी इतिहास विभागातील सहायक प्रा.श्री सज्जन देव्हारे यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता सामुहिक पसायदान म्हणून झाली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इतिहास विषयाची बी ए द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. तांबोळी आफ्रीन हिने केले.

<u>उद्दिष्टपूर्ती :</u>

या व्याख्यानातून स्वातंत्र्य संग्रामातील हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे महत्व विद्यार्थ्यांना माहीत झाले. हैद्राबादच्या निजामशाहीविषयी, हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील अनेकांच्या योगदानाविषयी नवीन माहिती मिळाली. हैद्राबाद मुक्तीलढ्याचा संशोधानाधारित इतिहास अभ्यासण्यास विद्यार्थ्यांना मदत झाली. शिवाय स्थानिक इतिहासाविषयी, त्याच्या अभ्यासाविषयी जिज्ञासा जागृतीही निर्माण झाली.

# भित्तीपत्रक अनावरण कार्यक्रम




**हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त इतिहास विभागाच्या वतीने आयोजित भित्तीपत्रक अनावरण प्रसंगी मार्गदर्शक, संस्था सदस्य श्री. कमलाकर पाटील दि. १७/०९/२०२२**






**हैद्राबाद मुक्तीसंग्राम दिनानिमित्त इतिहास विभागाच्या वतीने आयोजित भित्तीपत्रक अनावरण प्रसंगी विद्यार्थी संपादक मंडळ, अध्यापक व प्राचार्य    दि. १७/०९/२०२२**



# भित्तीपत्रक अनावरण कार्यक्रम

शनिवार, **दि.१७/०९/२०२२**

उद्दिष्ट :

विद्यार्थ्यांच्या लेखन, विचार, कलात्मकता, अभिव्यक्ती गुणांना वाव देणे, अध्यापन पूरक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, तसेच अभ्यासपूरक अतिरिक्त वाचन व माहिती संकलन करण्याची आणि स्थानिक इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हा या भित्तीपत्रक निर्मितीमागील उद्देश होय.

शनिवार दि १७/०९/२०२२ रोजी हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त ध्वजवंदन संपन्न झाल्यानंतर सकाळी ८.३० वाजता महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त बी. ए. द्वितीय व प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी 'हैदराबाद मुक्तिसंग्राम:मराठवाड्याचे योगदान' या विषयावर तयार केलेल्या या भित्तीपत्रकाच्या संपादक व लेखन मंडळावर बी. ए प्रथम वर्षाच्या सुतार मानसी, पवार वैष्णवी, वैरागे नेहा, तर बी ए द्वितीय वर्षाच्या बागवान महविश या विद्यार्थ्यांनी काम केले. त्यांना इतिहास विभागप्रमुख प्रा डॉ कुलकर्णी जयश्री यांचे मार्गदर्शन लाभले.

मा. प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. श्री. कमलाकरबापू पाटील यांच्या हस्ते या इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांच्या हस्तलिखित भित्तीपत्रकाचे अनावरण संपन्न झाले. प्रथम इतिहास विभाग प्रमुख प्रा. डॉ. कुलकर्णी जे. आर. यांनी या कार्यक्रमाची व भित्तीपत्रकाच्या निर्माणामागील भूमिका स्पष्ट केली. भित्तीपत्रकाचे लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रकाची माहिती सांगितली. त्यानंतर मा. श्री. कमलाकरबापू पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छापर मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, अशा उपक्रमांमधून आपल्या विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला, अभ्यास वृत्तीला दिशा मिळते, त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा. त्यानंतर इतिहास विभागातील प्रा. डॉ. कुलकर्णी जे.आर. यांनी आभारप्रदर्शन केले.

प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये इतिहास विभागाच्यावतीने १७ सप्टेबर आणि १९ फेब्रुवारी यादिवशी विद्यार्थ्यांच्या हस्तलिखित भित्तीपत्रकांचे लेखन व अनावरण केले जाते.

उद्दिष्टपूर्ती :

विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील मराठवाडा/हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि त्यातील मराठवाड्याचे योगदान या विषयाशी संबंधित वाचन करून माहिती संदर्भ ग्रंथ, इंटरनेट वरून संकलित केली. सदर माहिती सुव्यवस्थितपणे मांडणी करून सुवाच्य अक्षरात शब्दबध्द केली. कलात्मक पद्धतीने भित्तीपत्रकाची सजावट केली. यातून त्यांच्या सृजनशीलतेला चालनाही मिळाली आणि नाविन्यपूर्ण निर्मितीचा आनंदही मिळाला.


# निबंध स्पर्धा व पारितोषिक वितरण समारंभ




"हैद्राबाद मुक्तीसंग्रामानंतरचा मराठवाडा" विषयावरील निबंध स्पर्धेचे पारितोषिक वितरण करताना संस्था सचिव ॲड. मिलिंद पाटील, सदस्य श्री. कमलाकर पाटील व प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी. दि. १७/०९/२०२२






Note cam lite
Address : Lakshmi Nagar,Osmanabad,Maharashtra,India
Latitude : 18.18752°
Longitude : 76.046525°
Altitude : 654.5 meter
Date : 09/17/2022 08:18 am
Accuracy : 1.3 meter
Time zone : IST


Note cam lite
Address : Lakshmi Nagar,Osmanabad,Maharashtra,India
Latitude : 18.187528333333333°
Longitude : 76.04652833333333°
Altitude : 651.5 meter
Date : 09/17/2022 08:16 am
Accuracy : 1.5 meter
Time zone : IST

# निबंध स्पर्धा व पारितोषिक वितरण समारंभ

शनिवार, **दि.१६,१७/०९/२०२२**

उद्दिष्ट :

विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्य, विचारक्षमता, कल्पनाविस्तार, अभिव्यक्ती इत्यादी गुणांना वाव देणे, अध्यापन पूरक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, तसेच अभ्यासपूरक अतिरिक्त वाचन व माहिती संकलन करण्याची आणि मराठवाड्याचा स्थानिक इतिहास व वर्तमान स्थिती जाणून घेण्याची जिज्ञासा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हा या उपक्रमामागील उद्देश होय.

महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या व व्होकेशनल महाविद्यालयाच्या वतीने हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या अमृतमहोत्सवी वर्षारंभाच्या पार्श्वभूमीवर दिनांक १६/०९/२०२२ रोजी 'हैद्राबाद मुक्तिसंग्रामानंतरचा मराठवाडा' याविषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत महाविद्यालयातील कला, विज्ञान, वाणिज्य, संगणक व्यवस्थापन शाखेतील आणि व्होकेशनल महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यांच्या निबंधांचे परीक्षण महाविद्यालयातील मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. सहदेव रसाळ यांनी केले आणि वारीष्ठ महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ असे चार विजेते निवडले. त्या विजेत्यांची नावे पुढीलप्रमाणे:-

- प्रथम पारितोषिक - तांबोळी आफ्रीन खय्युम ( बी ए द्वितीय वर्ष)
- द्वितीय पारितोषिक - कुलकर्णी समर्थ प्रफुल्ल ( बी एस्सी तृतीय वर्ष)
- तृतीय पारितोषिक - हुंडेकर गौरी दयानंद (बी ए द्वितीय वर्ष)
- उत्तेजनार्थ पारितोषिक - जाधवर रेश्मा ( बी एस्सी तृतीय वर्ष)

या निबंध स्पर्धेतील पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांचा गौरव शनिवार दि. १७/०९/२०२२ रोजी हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त संपन्न झालेल्या कार्यक्रमात सकाळी ८.०० वाजता करण्यात आला. महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, महाविद्यालय विकास समितीचे सचिव ॲड श्री मिलिंद पाटील व सदस्य मा. श्री. कमलाकरबापू पाटील यांच्या हस्ते सदर निबंध स्पर्धेतील पारितोषिकप्राप्त विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ, रजिस्टर, पेन व प्रमाणपत्र देऊन पुरस्कारीत करण्यात आले. याप्रसंगी ॲड श्री मिलिंद पाटील व मा. श्री. कमलाकरबापू पाटील यांनी विविध स्पर्धामधील यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.


उद्दिष्टपूर्ती :

विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्य, विचारक्षमता, अभिव्यक्ती इत्यादी गुणांना वाव मिळाला. तसेच अभ्यासपूरक अतिरिक्त वाचन व माहिती संकलन करण्याचा आणि मराठवाड्याचा स्थानिक इतिहास व वर्तमान स्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी केला. शिवाय पुरस्कार सोहळ्याने त्यांच्या या प्रयत्नांना प्रोत्साहान मिळाले.

# <u>सेतू अभ्यासक्रम</u>

## दि. ०८-१०-२०२२ ते १९-१०-२०२२ या कालावधीत इतिहास विभागाच्या वतीने राबविण्यात आलेल्या सेतू अभ्यासक्रमावरील परीक्षा देताना विद्यार्थी दि. १९-१०-२०२२





तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, येवती संचलित

व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद.

इतिहास विभाग

सेतू अभ्यासक्रम – २०२२-२३

Tapaswi Public charitable Trust, Yeoti's

Venkatesh Mahajan Senior College, Osmanabad.

Department of History

Bridge Course-2022-23

# <u>सेतू अभ्यासक्रम</u>

शनिवार, **दि.०८/१०/२०२२ ते बुधवार दि.१९/१०/२०२२**

**उद्दिष्टे :-**

१. कोव्हीड-१९ मुळे आणि शिकणे शक्य झाले नाही ही वस्तुस्थिती आपणा सर्वांना चांगलीच माहीत आहे. येत्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालये पुन्हा सुरू झाली आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने शिक्षण देण्यासाठी शासनस्तरावर व महाविद्यालय स्तरावर विविध प्रयत्न करण्यात आले. त्यानुसार मागील शैक्षणिक वर्षांतील विद्यार्थ्यांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा घेणे आणि त्यांना या शैक्षणिक वर्षांत सध्याच्या वर्गाचा अभ्यासक्रम शिकण्यास मदत करणे या दुहेरी उद्देशाने सेतू अध्ययन वर्ग / ब्रिज कोर्स तयार करण्यात आला आहे. हा ब्रिज कोर्स २०२२-२३ या शैक्षणिक वर्षांच्या पूर्व तयारीसाठी तसेच मागील वर्षांच्या अभ्यासक्रमातील मूलभूत आणि महत्त्वाच्या संकल्पनांची उजळणी करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे.

२. विद्यापीठपूर्व स्तरावर शिकलेले विषय आणि ते पदवीपर्यंत शिकत असलेल्या विषयांमधील अंतर कमी करणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

३. अभ्यासक्रमाचा अभ्यासक्रम अशा प्रकारे तयार करण्यात आला आहे की ते पदवीपर्यंत ज्या विषयांचे शिक्षण घेतील त्या विषयांचे त्यांना मूलभूत ज्ञान मिळेल.

४. विद्यार्थांना महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रम यशस्वीरित्या समजण्यासाठी आत्मविश्वास आणि कौशल्ये मिळावेत.

५. कोव्हीड- १९ मुळे आणि शिकणे शक्य झाले नाही ही वस्तुस्थिती आपणा सर्वांना चांगलीच माहीत आहे. येत्या शैक्षणिक वर्षात महाविद्यालये पुन्हा सुरू झाली आहेत. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने शिक्षण देण्यासाठी शासनस्तरावर व महाविद्यालय स्तरावर विविध प्रयत्न करण्यात आले. त्यानुसार मागील शैक्षणिक वर्षांतील विद्यार्थ्यांनी केलेल्या अभ्यासाचा आढावा घेणे आणि त्यांना या शैक्षणिक वर्षात सध्याच्या वर्गाचा अभ्यासक्रम शिकण्यास मदत करणे या दुहेरी उद्देशाने सेतू अध्ययन वर्ग / ब्रिज कोर्स तयार करण्यात आला आहे. हा ब्रिज कोर्स २०२२-२३ या शैक्षणिक वर्षाच्या पूर्व तयारीसाठी तसेच मागील वर्षाच्या अभ्यासक्रमातील मूलभूत आणि महत्त्वाच्या संकल्पनांची उजळणी करण्याच्या उद्देशाने तयार करण्यात आला आहे.

६. विद्यापीठपूर्व स्तरावर शिकलेले विषय आणि बी.ए वर्गात शिकत असलेले विषय यांच्यातील अंतर कमी करणे.

७. परस्परसंवादी आणि सक्रिय शिकणारे विद्यार्थी प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमापूर्वी ज्ञान आणि आत्मविश्वासाने सुसज्ज व्हावेत.

वरील उद्दिष्टे समोर ठेऊन दिनांक ०८/१०/२०२२ ते १९/१०/२०२२ या कालावधीत इतिहास विभागाच्या वतीने बी.ए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी सेतू अभ्यासक्रम राबविण्यात आला. या अभ्यासक्रमास एकूण २१ विद्यार्थी प्रवेशित होते. या अभ्यासक्रमासाठी १२ वी व बी.ए. परथम वर्षाचे इतिहास विषयाचे निवडक घटक निवडण्यात आले.नियमित वेळापत्रक तयार करून दुपारी ०३ ते ०४ या वेळेत तासिका घेण्यात आल्या. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नियमित तासिका इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.कुलकर्णी जे.आर. व सहकारी प्रा.देव्हारे एस.एस. यांनी घेतल्या.सुरवातीस तीस मार्कांची पूर्व चाचणी घेऊन विद्यार्थ्यांचे विषय ज्ञान तपासण्यात आले. व त्यानुसार पुढील अध्यापन करण्यात आले.

<u>उद्दिष्टपूर्ती :</u>


कोविड-19च्या काळात घेण्यात आलेल्या ऑन लाईन अध्यापनात विद्यार्थ्यांना आलेल्या अडचणींवर मात करण्यास आणि बारावी व बी ए प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न या सेतू अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करण्यात आला. मागील वर्षाच्या अभ्यासक्रमातील मूलभूत आणि महत्त्वाच्या संकल्पनांची उजळणी तसेच नवीन वर्षाच्या अभ्यासक्रमातील नवीन घटना व संकल्पनांची ओळख या माध्यमातून विद्यार्थ्यांना झाली.

<u>दुर्मिळ ग्रंथ, पोस्टर्स व छायाचित्र प्रदर्शनी आणि मार्गदर्शन कार्यक्रम</u>




**हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षारंभानिमित्त इतिहास विभागाच्या वतीने आयोजित दुर्मिळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, पोस्टर व छायाचित्र प्रदर्शनी दि. १४/१०/२०२२**






हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षारंभानिमित्त इतिहास विभागाच्या वतीने आयोजित दुर्मिळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, पोस्टर व छायाचित्र प्रदर्शनीचे संकलक व मार्गदर्शक प्रा. डॉ. सुनिल पुरी

दि.१४/१०/२०२२










**हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षारंभानिमित्त इतिहास विभागाच्या वतीने आयोजित दुर्मिळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, पोस्टर व छायाचित्र प्रदर्शनीच्या अध्यक्षपदारून मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी, प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी व उपस्थित श्रोते. दि. १४/१०/२०२२**



दुर्मिळ ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्रे, पोस्टर व छायाचित्र प्रदर्शनीचे संकलक व  मार्गदर्शक प्रा. डॉ. सुनिल पुरी उपस्थितांना माहिती देताना

दि.१४/१०/२०२२












स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राचे उद्गाते श्री. पार्थ बावसकर यांची प्रदर्शनीस भेट व प्रा. डॉ. सुनिल पुरी यांचा सत्कार. दि. १४/१०/२०२२




संस्था सचिव ॲड. श्री. मिलिंद पाटील यांची प्रदर्शनीस भेट दि. १४/१०/२०२२






लोकमत

# महाजन महाविद्यालयात दुर्मीळ ग्रंथांचे प्रदर्शन

## इतिहास, ग्रंथालय विभागाचा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**उस्मानाबाद :** येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात इतिहास विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'हैद्राबाद मुक्ती संग्राम' या विषयावरील दुर्मीळ ग्रंथ व पोस्टर प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. याचे उद्घाटन तपस्वी पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव ॲड. मिलिंद पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी प्राचार्य प्रा. डॉ. प्रशांत चौधरी, प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी ग्रंथालय विभाग प्रमुख सचिन महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती. लातूर जिल्ह्यातील औसा येथील कुमार स्वामी महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुनील पुरी यांच्या वैयक्तिक संग्रहातून या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. यात हैदराबाद मुक्तिसंग्रामामधील विविध वृत्तपत्रांमधून आलेले लेख, दुर्मीळ ग्रंथ, दुर्मीळ फोटो आदींचा समावेश होता.

प्रस्ताविक व प्रदर्शनामागील भूमिका इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी यांनी मांडली. सूत्रसंचालन प्रा. रवींद्र कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व प्राध्यापक उपस्थित होते.

Hello Osmanabad
Page No. 4 Oct 18, 2022
Powered by: erelego.com

# <u>दुर्मिळ ग्रंथ, पोस्टर्स व छायाचित्र प्रदर्शनी आणि मार्गदर्शन कार्यक्रम</u>

शुक्रवार, **दि.१४/१०/२०२२**

उद्दिष्ट :

हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या अमृतमोहोत्सवी वर्षाच्या प्रारंभाच्या पार्श्वभूमीवर हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे आणि त्यातील मराठवाड्याचे योगदान विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवणे, यासंदर्भातील संशोधन, लेखन आणि छायाचित्रण दृश्य रूपाने सर्वांपर्यंत पोहोचवणे आणि इतिहासाच्या विद्यार्थ्यांना इतिहास, ऐतिहासिक साधने, संशोधन याबरोबरच वस्तुसंग्रहालय व त्याचे महत्व ज्ञात करून देणे, स्थानिक संस्कृती आणि इतिहासाचे जतन करण्याविषयी जागृती निर्माण करणे हा या प्रदर्शनीच्या आयोजनामागील उद्देश होय.

१७ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद संस्थान जुलुमी निजामशहाच्या वर्चस्वातून मुक्त झाले. तो दिवस हैद्राबाद मुक्तीसंग्रामदिन म्हणून भारतभर साजरा केला जातो. या हैद्राबाद मुक्तीसंग्रामाच्या अमृत महोत्सव वर्षारंभानिमित्त महाविद्यालयाच्या इतिहास व ग्रंथालय विभागाच्या वतीने शुक्रवार दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० यावेळेत ऐतिहासिक वस्तूप्रदर्शनी आणि प्रा.डॉ.सुनील पुरी यांचा मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, कर्मचारी याच्याबरोबरच शहरातील इतिहासप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. प्रदर्शनीच्या उद्घाटन व मार्गदर्शन कार्यक्रमास महाविद्यालयातील ८७ विद्यार्थी, २३ अध्यापक व ५० नागरिकांनी, उपस्थिती दर्शविली. तर दिवसभर ५०० हून अधिक जणांनी प्रदर्शनीला भेट दिली.

पूर्वनियोजनानुसार महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये आयोजित 'हैद्राबाद मुक्तीसंग्राम' या विषयावरील प्रदर्शनीमध्ये कुमारस्वामी महाविद्यालय, औसा येथील इतिहास विभाग प्रमुख आणि महाराष्ट्रातील प्रसिध्द इतिहास संशोधक प्रा.डॉ.सुनील पुरी यांच्या व्यक्तिगत संग्रहातील एक हजारपेक्षा जास्त दुर्मिळ आणि संशोधनपर ग्रंथ, हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांची पाचशेहून अधिक पोस्टर्स, औसा किल्ला व मराठवाड्यातील मंदिरांची एक हजाराहून अधिक छायाचित्रे प्रदर्शित करण्यात आली. प्रदर्शनीचे उद्घाटन सकाळी १०.०० वाजता सरस्वती माता आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले. त्यानंतर मार्गदर्शक व संयोजन समितीतील कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे स्वागत मा प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभागप्रमुख आणि कार्यक्रमच्या संयोजक प्रा डॉ कुलकर्णी जयश्री यांनी केले. प्रमुख वक्त्यांचा परिचय श्री रविंद्र कुलकर्णी यांनी करून दिला व यानंतर प्रमुख वक्ते प्रा डॉ सुनील पुरी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी हैद्राबाद मुक्तीसंग्राम संदर्भातील संशोधन, हैद्राबाद मुक्तीसंग्रामातील स्वातंत्र्यसैनिकांची कामगिरी, आणि प्रदर्शनीतील छायाचित्रांविषयी सविस्तर माहिती सांगितली. त्यानंतर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी अध्यक्षीय समारोप केला. यावेळी त्यांनी प्रा डॉ सुनील पुरी यांच्या संकलनाचे आणि मराठवाडाभर प्रदर्शनी लावण्याच्या त्यांच्या उपक्रमाचे कौतुक केले. श्री रविंद्र कुलकर्णी यांनी आभारप्रदर्शन व सूत्रसंचालन केले. सामुहिक पसायदानाने उद्घाटन सत्राची सांगता झाली.

उद्घाटन सत्रानंतर प्रा.डॉ.सुनील पुरी यांनी सर्व विद्यार्थी आणि उपस्थितांना संपूर्ण प्रदर्शनीतील वस्तूंची माहिती दिली. यावेळी महाविद्यालय विकास समितीचे सचिव ॲड श्री मिलिंद पाटील, सदस्य मा. श्री. कमलाकरबापू पाटील, राष्ट्रसेविका समितीच्या पदाधिकारी,सौ शर्मिष्ठा डांगे, सौ नायगावकर तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राचे अभ्यासक, व्याख्याते श्री पार्थ बावसकर यांची महत्वपूर्ण उपस्थिती होती. त्यांनी या वस्तूंच्या संकलनाबद्दल .डॉ.सुनील पुरी यांचा शाल,श्रीफळ देऊन हृद्य सत्कार केला. दिवसभर हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले होते. त्याचा लाभ शाहरातील अभ्यासक, महाविद्यालयीन विद्यार्थी-अध्यापक, तसेच आर्य चाणक्य विद्यालयातील विद्यार्थ्यांनीही घेतला.

<u>उद्दिष्टपूर्ती :</u>

हैद्राबाद मुक्तीसंग्रामाचे आणि त्यातील मराठवाड्याचे योगदान विद्यार्थी आणि समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचवणे हा मुख्य उद्देश काही अंशी सफल झाला. शिवाय यासंदर्भातील संशोधन, लेखन आणि छायाचित्रण दृश्य रूपाने सर्वांपर्यंत पोहोचले आणि इतिहासाच्या विद्यार्थ्यांना इतिहास, ऐतिहासिक साधने, संशोधन याबरोबरच वस्तुसंग्रहालय व त्याचे महत्व याविषयी सखोल माहिती मिळाली. स्थानिक संस्कृती आणि इतिहासाचे जतन करण्याविषयी जागृती निर्माण करण्यासाठी या प्रदर्शनीचा नक्कीच उपयोग झाला.

<u>शिवजयंती निमित्त भित्तीपत्रक अनावरण कार्यक्रम</u>




**शिवजयंती निमित्त इतिहास विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांचे हस्तलिखित भित्तीपत्रक "शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ" अनावरण दि. १९/०२/२०२३**



पुरोगामी विचाराचे
एकमत
page- 5
21 Feb 2023

# महाजन महाविद्यालयात शिवजयंती



**उस्मानाबाद : प्रतिनिधी**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य प्रा. डॉ.प्रशांत चौधरी यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

शिवजयंतीचे औचित्य साधून इतिहास विभागाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या भित्तीपत्रकाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच ग्रंथालय विभागाच्या वतीने १९ ते २२ फेब्रुवारी या कालावधीत ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथ प्रदर्शनामध्ये शिवचरित्रावरील विविध ग्रंथाचा समावेश आहे. या ग्रंथ प्रदर्शनाला विद्यार्थ्यांनी भेट द्यावी, असे आवाहन ग्रंथपाल सचिन महाजन यांनी केले आहे. सूत्रसंचालन प्रा. डॉ. संजय जोशी यांनी केले. यावेळी प्राध्यापक वर्ग, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**दि. १९/०२/२०२३ रोजीच्या शिवजयंती निमित्त इतिहास विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांचे हस्तलिखित भित्तीपत्रक "शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ" अनावरण व ग्रंथ प्रदर्शनीची वृत्त पत्रातील बातमी प्रसिद्धी दि. २१/०२/२०२३**

# <u>भित्तीपत्रक अनावरण कार्यक्रम</u>

रविवार, **दि.१९/०२/२०२३**

उद्दिष्ट :

विद्यार्थ्यांच्या लेखन, विचार, कलात्मकता, अभिव्यक्ती गुणांना वाव देणे, अध्यापन पूरक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवणे, तसेच अभ्यासपूरक अतिरिक्त वाचन व माहिती संकलन करण्याची आणि शिवकालीन प्रशासनाचा व प्रशासन नीतीचा सखोल इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे हा या भित्तीपत्रक निर्मितीमागील उद्देश होय.

रविवार दि १९/०२/२०२३ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात सकाळी ८.५० वाजता महाविद्यालयाच्या इतिहास विभागाच्या 'शिवरायांचे अष्टप्रधान मंत्रिमंडळ'या विषयावरील भित्तीपत्रकाचे अनावरण करण्यात आले. हैद्राबाद मुक्तिसंग्राम दिनानिमित्त बी. ए. द्वितीय व प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी या विषयावर तयार केलेल्या या भित्तीपत्रकाच्या संपादक व लेखन मंडळावर बी. ए प्रथम वर्षाच्या सय्यद चांद, कु सोनवणे सोनी, कु कचरे प्राप्ती, तर बी ए द्वितीय वर्षाच्या कु तांबोळी आफ्रीन, कु बागवान महविश या विद्यार्थ्यांनी काम केले. त्यांना इतिहास विभागप्रमुख प्रा डॉ कुलकर्णी जयश्री, प्रा देव्हारे सज्जन, श्री कुलकर्णी रविंद्र यांचे मार्गदर्शन लाभले.

मा. प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांच्या हस्ते या इतिहास विषयाच्या विद्यार्थ्यांच्या हस्तलिखित भित्तीपत्रकाचे अनावरण संपन्न झाले. भित्तीपत्रकाचे लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांनी भित्तीपत्रकाची माहिती सांगितली. त्यानंतर प्राचार्य डॉ. प्रशांत चौधरी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छापर मार्गदर्शन करताना ते म्हणाले की, अशा उपक्रमांमधून आपल्या विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला, अभ्यासूपणाला चालना मिळते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी नियमित अशा उपक्रमात सहभागी व्हावे. त्यानंतर इतिहास विभागातील **प्रा. श्री. कुलकर्णी आर. के.** यांनी आभारप्रदर्शन केले.

<u>उद्दिष्टपूर्ती :</u>

विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील मराठवाडा/हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि त्यातील मराठवाड्याचे योगदान या विषयाशी संबंधित वाचन करून माहिती संदर्भ ग्रंथ, इंटरनेट वरून संकलित केली. सदर माहिती सुव्यवस्थितपणे मांडणी करून सुवाच्य अक्षरात शब्दबध्द केली. कलात्मक पद्धतीने भित्तीपत्रकाची सजावट केली. यातून त्यांच्या सृजनशीलतेला चालनाही मिळाली आणि नाविन्यपूर्ण निर्मितीचा आनंदही मिळाला.